वैचारिक क्रांतीचा अग्रदूत
देशोन्नती



# पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांचा आझाद 'एनजीओ'तर्फे सत्कार

**प्रतिनिधी / २९ नोव्हेंबर**

**औरंगाबाद :** आझाद अली शाह शिक्षण संस्थेअंतर्गत संचलित आझाद (एनजीओ) खडकेश्वर औरंगाबादच्या संचालक मंडळ व संस्थेअंतर्गत चालणाऱ्या शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांच्यावतीने संस्थेच्या अध्यक्षा सुरैय्याखान व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी खान साजिद पाशा यांनी औरंगाबाद शहराचा चेहरा मोहरा बदलणारे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांचा सत्कार केला.



संस्थेचा अध्यक्षा आझाद अली शाह व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी खान साजिद पाशा यांच्या नेतृत्वात संस्थेचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी यांनी संध्याकाळी ६.३० वाजता पोलिस आयुक्तालयात जाऊन शहर पोलिस आयुक्त यांच्याकडून होत असलेल्या चांगल्या कामाबद्दलची दखल घेऊन पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांचा सत्कार केला. संस्थेचे प्रशासकीय अधिकारी साजिद पाशा यांनी सांगितले की, शहरातील एक जे दहशतीचे वातावर ण निर्माण झाले होते ते यांच्या रूज झाल्यापासून कमी झाले. तसेच शहरातील अवैध धंद्यांना आळा बसला. यावेळी मदीहा फातेमा, शुभांगी कुलकर्णी, मुकीम पटेल, सैयदा अफसर, शेख अरिफ, छाया देहेरे, रिजवाना मन्सु री, खान आयशा आदी कर्मचारी व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते